# ई - पोलीस पत्रिका

दिनांक ०७/०३/२०२५ अनु.क्र. ४६

**(अमरावती शहर पोलीसांची २०२५ ची उद्दिष्टे)**

- **नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.**
- **उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.**
- **महीला, मुले व जेष्ठ नागरिकांचीसुरक्षा.**
- **जातीयसलोखा वाढविणे.**
- **संघटितगुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.**
- **रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.**
- **पोलीसकोठडीतगुन्हे घडु न देणे.**
- **आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.**
- **"सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.**

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## रजा

**१.पोआअ/आस्था-५/अर्जित रजा/२३६८/२०२५अमरावती शहर दिनांक ०५/०३/२०२५**

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) १९८१ मधील नियम ५० चे तरतुदीप्रमाने रजेवर सुटलेल्या दिनांका पासुन अर्जित रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम /ब.न. | नाव | नेमणुक | मंजुर अर्जित रजा | रजा मागण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १. | सपोउपनि/२१३ | गजानन खडेकार | पो.स्टे.बडनेरा | १५ दिवस | घर दुरुस्तीकामे |
| २. | पोशि/७५२ | प्रविण उगले | डायल-११२ | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| ३. | मपोशि/९६८ | प्रियंका काळमेघ | डायल-११२ | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| ४. | मपोशि/२५१ | विशाखा तिरमारे | डायल-११२ | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| ५. | पोशि/२७३ | विक्रांत करपे | डायल-११२ | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| ६. | पोहवा/१२१० | प्रशांत अघाव | डायल-११२ | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| ७. | मपोशि/५९६ | पुजा पांडे | पो.मुख्यालय | १५ दिवस | मुलीच्या देखभालीकरीता |
| ८. | मपोहवा/१६७ | सुनिता बोडखे | पो.मुख्यालय | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| ९. | पोहवा/३०३ | मिलींद तायडे | पो.मुख्यालय | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| १०. | पोहवा/१९१ | सतिष खंडारे | कोतवाली | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| ११. | पोशि/१६९९ | सचिन फुंडे | पो.मुख्यालय | १५ दिवस | घर दुरुस्तीकामे |
| १२. | मपोहवा/११८० | सुकेशिनी चक्रनारायण | कोतवाली | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| १३. | पोहवा/१०२४ | रविंद्र हरणे | कोतवाली | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| १४. | सपोउपनि/९३९ | शंकर भगत | कोतवाली | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| १५. | मपोहवा/१४६ | अलका भुडके | कोतवाली | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| १६. | मपोशि/६२८ | अश्विनी बानुवाकोडे | कोतवाली | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| १७. | पोशि/१७७७ | शेख जमील | कोतवाली | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| १८. | पोहवा/३४ | राजेंद्र पिंपळे | कोतवाली | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| १९. | पोहवा/१३० | निखील माहुरे | पो.स्टे.सायबर | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| २०. | मपोशि/१८८८ | हर्षाली देवळे | पो.मुख्यालय | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| २१. | मपोहवा/७७ | माधवी धायगुडे | पो.स्टे.बडनेरा | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| २२. | पोहवा/१२१२ | संजय भेलाये | गाडगेनगर | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| २३. | पोशि/११४२ | पंकज अकोटकर | गाडगेनगर | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| २४. | मपोशि/१४७६ | कांचन ठोसर | महिला सेल | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| २५. | कर्मशाळा मदतनीस | दयाराम धांडेकर | बिनतारी संदेश | १० दिवस | धार्मिक कामा करीता |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २६. | पोशि/४५४ | मुकेश अग्रवाल | दंगा नि.प. | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |

तसेच नमुद पोलीस अंमलदार यांना रजेवर रवाना केलेल्या दिनांकापासुन अर्जित रजा उपभोगल्याचा अहवाल या कार्यालयात सादर करावा.

**२.पोआअ/आस्था-५/सिक अहवाल/२३६४/२०२५अमरावती शहर दिनांक ०५/०३/२०२५**

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचा खालील नमुद रुग्णनिवेदन कालावधी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र | पदनाम/ ब.क्र./नाव | नेमणुक | रुग्णनिवेदन कालावधी | प्राधिकार |
|---|---|---|---|---|
| १ | पोशि/४४९, विजय यादव | मोपवि | दि.२५/११/२०२४ ते दि.०७/०१/२०२५ पर्यत ४४ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | नियम ६१ नुसार |
| २ | मपोशि/१७५१, नेहा शर्मा | पोलीस मुख्या | दि.२९/१२/२०२४ ते दि.०९/०१/२०२५ पर्यत १२ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | नियम ६१ नुसार |
| ३ | मपोशि/६८३, भाग्यश्री लायबर | पोलीस मुख्या | दि.११/०१/२०२५ ते दि.२५/०१/२०२५ पर्यत १५ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | नियम ६१ नुसार |
| ४ | पोशि/७१९, अनुप झगडे | गाडगेनगर | दि.२९/१२/२०२४ ते दि.०७/०१/२०२५ पर्यत ०९ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | नियम ६१ नुसार |
| ५ | पोशि/१६९४, अश्विन पवार | भातकुली | दि.२६/११/२०२४ ते दि.११/०१/२०२५ पर्यत ४६ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | नियम ६१ नुसार |
| ६ | मपोशि/९४९, संगिता डोंगरदिवे | पोलीस मुख्या | दि.२३/१२/२०२४ ते दि.०७/०१/२०२५ पर्यत १६ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | नियम ६१ नुसार |
| ७ | मपोशि/१५९८, मंगला धांडे | पोलीस मुख्या | दि.२०/१२/२०२४ ते दि. १६/०१/२०२५ पर्यत २८ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | नियम ६१ नुसार |
| ८ | मपोशि/१३७३, अर्चन खंडारे | पोलीस मुख्या | दि.१८/१२/२०२४ ते दि.२०/०१/२०२५ पर्यत ३४ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | नियम ६१ नुसार |
| ९ | मपोशि/५९४, रोशनी नागोसे | फ्रेजरपुरा | दि.११/१२/२०२४ ते दि.३०/१२/२०२४ पर्यत २० दिवस परिवर्तीत रजा मंजुर | नियम ६१ नुसार |
| १० | पोशि/२६३ बादल तिवारी | मोपवि | दि.१२/१२/२०२४ ते दि.२७/१२/२०२४ पर्यत १५ दिवस परिवर्तीत रजा मंजुर | नियम ६१ नुसार |
| ११ | पोशि/७४५, संदिप निकम | भातकुली | दि.२६/०९/२०२४ ते दि.०५/१०/२०२४ पर्यत १० दिवस परिवर्तीत रजा व<br>दि. ०६/१०/२०२४ ते दि.२३/१०/२०२४ पर्यत १८ दिवस अर्जित रजा मंजुर | नियम ६१ नुसार<br>नियम ५० नुसार |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | मपोना/३२५, श्रीकांत खडसे | बडनेरा | दि.२७/११/२०२४ ते दि.२६/१२/२०२४ पर्यत ३० दिवस परिवर्तीत रजा व<br>दि.२७/१२/२०२४ ते दि.०३/०१/२०२५ पर्यत ०८ दिवस अर्जित रजा मंजुर | नियम ६१ नुसार<br>नियम ५० नुसार |
| १३ | मपोशि/१५९५, सोनु मंडे | बडनेरा | दि. २०/१२/२०२४ ते दि.२९/१२/२०२४ पर्यत १० दिवस परिवर्तीत रजा मंजुर व<br>दि.३०/१२/२०२४ ते दि.३१/१२/२०२४ पर्यत ०२ दिवस अर्जित रजा मंजुर | नियम ६१ नुसार<br>नियम ५० नुसार |

तसेच वर नमुद अमलदार यांना त्यांचे मंजुर रजेची माहिती देऊन आपल्या येथील सिक रजिस्टरमध्ये तशी नोंद करण्यात यावी.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## शिक्षा

**१.पोआअश/विचौ-१/निलंबन/पोना-९४४ चौधरी + १/२२४२/२०२५, अमरावती शहर दि. ०१/०३/२०२५**

### निलंबन आदेश

१. ज्याअर्थी तुम्ही ज्या अर्थी तुम्ही १) पोना/९४४ राजेश मधुकरराव चौधरी, नेमणूक पोलीस स्टेशन खोलापूरी गेट, अमरावती शहर, सद्या उजळणी कोर्स करिता पोलीस मुख्यालय, अमरावती शहर २) पोशि/१०४ प्रफुल सिताराम खोब्रागडे, नेमणूक पोलीस मुख्यालय अमरावती शहर तुमची दिनांक २६/०२/२०२५ रोजी चे २०.०० वा. ते दि.२७/०२/२०२५ चे ०८.०० वा. पर्यंत मा. जिल्हा व सत्र न्यायाधिश सा. अमरावती यांचे निवासस्थान परिसरात सुरक्षा गार्ड डयुटी नेमलेली असतांना तुम्ही गार्ड रुम मध्ये झोपून राहीले त्या दरम्यान मा. जिल्हा व सत्र न्यायाधिश सा. अमरावती यांचे निवासस्थान परिसरातील ०२ चंदनाची झाडे कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली. तुम्ही सुरक्षा गार्ड डयुटीमध्ये सतर्क राहून कर्तव्यपार न पाडता अत्यंत बेसावध व निष्काळजीपणे कर्तव्यावर कार्यरत असल्याचे आढळून आले. त्यामुळे तुमचे कर्तव्याप्रती मा. जिल्हा व सत्र न्यायाधिश सा. अमरावती यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे.

२. तुमच्या अशा बेशिस्त, बेजबाबदार, अशोभनिय कृत्यामुळे पोलीस खात्याची जनसामान्य माणसात प्रतिमा मलीन झाली आहे. तुम्ही पोलीस विभागात जबाबदार पोलीस अंमलदार या पदावर कार्यरत असून सुध्दा तुमच्या निष्काळजीपणाचे गैरवर्तणाच्या कृत्यामुळे तुम्ही सुरक्षा कर्तव्यावर उपस्थित असतांना देखिल उपरोक्त प्रमाणे गंभीर घटना घडली आहे.

३.    त्याअर्थी आता मुंबई पोलीस कायदा १९५१ मधील कलम २५ मधील १ (ख)  आणि मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील नियम ३ (१) (अ-२) च्या तरतुदीनुसार, तसेच विभागीय चौकशी नियम पुस्तीका १९९१ मधील प्रकरण दोन मधील नियम  २.२ (अ) च्या तरतुदीनुसार आदेशाच्या दिनांकापासुन शासन सेवेतुन निलंबित करण्यात येत आहे.

४.    त्यानुसार असेही आदेश देण्यात येत आहे की, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वियेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकने यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ चे नियम ६८(एक) (अ) नुसार निर्वाह भत्ता व त्यावरील अनुज्ञेय महागाई भत्ता देण्यात येईल.

५.    आणखी असेही आदेश देण्यात येत आहे की, जोपर्यंत निलंबनाचे आदेश अस्तित्वात असतील तो पर्यंत १) पोना/९४४ राजेश मधुकरराव चौधरी,२) पोशि/१०४ प्रफुल सिताराम खोब्रागडे, यांचे मुख्यालय, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर हे राहील. निलंबन काळात तुम्हाला मुख्यालयात हजेरी देणे अनिवार्य राहील. तसेच तुम्हाला पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या पुर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही. पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या पुर्व परवानगी शिवाय तुम्ही मुख्यालय सोडल्यास ती तुमची गैरवर्तणुक ठरेल व त्या कारणासाठी वेगळया शिस्तभंगाच्या कारवाईस तुम्ही पात्र ठराल, तसेच मुख्यालयी हजर नसल्याचे आढळून आल्यास त्या दिवसाचा निर्वाह भत्ता गमावल्यास तुम्ही जबाबदार राहाल.

६.    सदर निलंबनाचा आदेश अस्तित्वात असे पर्यंत विभागीय चौकशी नियमपुस्तिका १९९१ मधील २.३ नूसार तुम्हांस कोणत्याही प्रकारचा खाजगी उद्योग अथवा नोकरी करता येणार नाही. खाजगी उद्योग अथवा नोकरी केली नसल्याचे प्रमाणपत्र महिना पूर्ण झाल्यानंतर या कार्यालयास सादर करावे लागेल. जर या कालावधीत कोणतीही खाजगी नोकरी अथवा उद्योग केल्याचे आढळुन आल्यास तुमच्या विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल.

७.    मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ च्या नियम ०३ पोटनियम (१-अ), खंड (एक) च्या परंतुकानूसार ज्या परिस्थितीत निलंबनाचे आदेश देण्यांत आले ती परिस्थिती नियुक्ती प्राधिका-यास ताबडतोब अहवालाव्दारे कळवून कार्योत्तर मंजूरी प्राप्त करण्यांत येणार आहे.

**२.पोआअश/वि.चौ.-१/पोना-९४४ चौधरी + १/कार्योत्तर मंजूरी/२३६३/२०२५, अमरावती शहर दि. ०५/०३/२०२५**

**संदर्भ :-** या कार्यालयाचे निलंबन आदेश क्रं. पोआअश/विचौ-१/निलंबन/पोना-९४४+१/२२४२/२०२५ दि.०१/०३/२०२५

**कार्योत्तर मंजूरी आदेश**

या कार्यालयाचे निर्गमित केलेल्या निलंबन आदेश क्रं. पोआअश/विचौ-१/निलंबन/पोना-९४४+१ /२२४२/ २०२५ दिनांक ०१/०३/२०२५ यास कार्योत्तर मंजूरी प्रदान करण्यांत येत आहे.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

### वेतन निश्चिती/

**१.पोआअ/आस्था-३/सु.वे.नि.पोशि-६७८/२२४८/२०२५ अमरावती शहर दिनांक ०३/०३/२०२५**

**<u>आदेश</u>**

संदर्भ :- १. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३, दि.०२.०३.२०१९
२. या कार्यालयाचे आदेश क्र. पोआअ/आस्था-प्रलि/आप्रयो/दुसरा लाभ/११८८/२०२५ दि.०८.०२.२०२५

आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवरील २० वर्षे नियमित सेवा पुर्ण झालेल्या खालील नमुद पोलीस अंमलदार यांना वरील संदर्भीय शासन निर्णय क्र.१ अन्वये सुधारीत वेतन संरचनेनुसार (७ व्या वेतन आयोगानुसार) सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला व दुसरा लाभ त्यांना देय असलेल्या दिनांकापासुन वरील संदर्भीय आदेश क्रमांक-२ अन्वये मंजुर करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११ (१) तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम २०१९ मधील नियम १३ अन्वये सातव्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर एस-९ (रु.२६४०० - रु.८३६००) मध्ये खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

| **पदनाम** | **वेतनस्तर** | **वेतनश्रेणी** |
|---|---|---|
| पोलीस नाईक | एस-८ | वेतन रु. २५५००-८११००/- |
| पोलीस हवालदार | एस-९ | वेतन रु. २६४००-८३६००/- |

**१. महिला पोलीस शिपाई/२६७, रेखा किसनराव डोळस, नेमणूक पो.स्टे.कोतवाली, अमरावती शहर**

| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती |
|---|---|---|---|
| ०१/०७/२०२४ | रु.४१०००/- एस-८ | ०१/०७/२०२४ | रु.४१०००/- एस-८ |
| | | १२/०७/२०२४ | सुधारीत आश्वासित प्रगती योजनेनुसार दुसरा लाभ मंजूर करण्यात आल्याने विद्यमान पदावर मानीव वेतनवाढ<br>रु.४२२००/- एस-८<br><br>नियम ११ (१)(अ) नुसार पदोन्नतीच्या (सपोउपनि) पदाची वेतननिश्चिती.<br>रु.४२३००/- एस-९ |

**२.पोलीस शिपाई/३७६, सुमेधबोधी विश्वनाथ पोहेकर, नेमणूक मोटार परिवहन विभाग, अमरावती शहर**

| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती |
|---|---|---|---|
| ०१/०७/२०२४ | रु.४१०००/- एस-८ | ०१/०७/२०२४ | रु.४१०००/- एस-८ |
| | | १२/०७/२०२४ | सुधारीत आश्वासित प्रगती योजनेनुसार |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | दुसरा लाभ मंजूर करण्यात आल्याने विद्यमान पदावर मानीव वेतनवाढ<br>रु.४२२००/- एस-८<br>नियम ११ (१)(अ) नुसार पदोन्नतीच्या (सपोउपनि) पदाची वेतननिश्चिती.<br>रु.४२३००/- एस-९ |

प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या सुधारीत वेतनिश्चितीमुळे अनुज्ञेय असणारी थकबाकी वेतनात रोखीन अदा करण्यात यावी. तसेच सदरची वेतन निश्चिती ही वेतन पडताळणी पथक यांचे अतिम तपासणीचे अधीन राहून करण्यात आली असून भविष्यात रकमेचे अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर अतिप्रदानाची रक्कम त्यांचे कडून वसूल करण्यात येईल.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,
पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस